| MHSN110000152025 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल ता. | : | ०३/०१/२०२५ |
| | नोंदणी ता. | : | ०३/०१/२०२५ |
| | निकाल ता. | : | २७/०७/२०२६ |
| | कालावधी : ०१व. ०६म. २४दि. | | |

आटपाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
(पीठासीन अधिकारी अश्विनी जोतिराम बाचुळकर)

न्यायनिर्णय तारीख : २७/०७/२०२६
नियमित फौजदारी खटला क्र.०१/२०२५
निशाणी : १९

(आटपाडी पोलीस ठाणे गु.र.नं.३६७/२०२४)

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस निरीक्षक, आटपाडी पोलीस ठाणे यांचेमार्फत |
| अभियोग पक्षातर्फे वकील | | सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे |
| आरोपी | | मयुर भगवान नसले,<br>वय : २५ वर्ष, धंदा : खाजगी नोकरी<br>रा. नसलेमळा, माडगुळे, ता. आटपाडी, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. एन. एस. पटेल |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १८/०९/२०२४ |

| | |
|---|---|
| एफ.आय.आर. तारीख | १८/०९/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०३/०१/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १७/०७/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १७/०७/२०२६ |
| निकाल राखून ठेवलेली तारीख | २७/०७/२०२६ |
| निकालाची तारीख | २७/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडलेली तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयुर भगवान नसले | बी.एन.एस.एस.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली | -- | भा.न्या.सं ११८(१), ३५२ | निर्दोष | -- | -- |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचा तपशील |
|---|---|---|
| १. | भगवान तुकाराम नसले (नि.१५) | वर्दीदार |

## निशाणी पडलेले कागद

अ. फिर्याद पक्ष

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १६ | वर्दीवरील सही |
| २. | १७ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

## न्यायनिर्णय
## (घोषित तारीख : २७/०७/२०२६)

**अभियोग पक्षाची बाजू थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वर्दीदार भगवान तुकाराम नसले यांनी पोलीस ठाण्यात हजर राहून वर्दीजबाब दिला की, दिनांक १८/०९/२०२४ रोजी सकाळी ८.३० वा.चे सुमारास त्यांचे घरासमोर नसले मळा, माडगुळे, ता.आटपाडी, जि.सांगली येथे वर्दीदार हे जनावरे शेतामध्ये चरण्यासाठी घेवून जात होते. त्यावेळी गायीला वेसनिला दोरी लावून ओढत जात असताना त्यांचा मुलगा म्हणजेच आरोपी मयुर नसले हा घरातून बाहेर येवून वर्दीदार यांना शिवीगाळ

करुन ''तुझ्या बा ने अशीच जनावरे राखली होती का?'' असे म्हणून पडलेली काठी घेवून वर्दीदार यांचे डावे हाताचे दंडावर, उजवे हातावर, डावे पायावर मारहाण केली. त्यावेळी वर्दीदार यांचे शेजारी हिरादास नारायण नसले, चंद्रकांत हिरादास नसले यांनी सदरचे भांडणे साडवली. त्यानंतर वर्दीदार यांनी आटपाडी पोलीस ठाण्यात येवून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

२. वर्दीदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आटपाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३६७/२०२४ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी सपोफौ/एम.एम.आवळे यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी गुन्ह्याच्या तपासकामी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवली, दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, घटनास्थळाचे उतारे हस्तगत केले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्राच्या स्वरुपात अंतिम अहवाल पाठविण्यात आला.

३. आरोपीला दोषारोप निशाणी १० येथे वाचून दाखविला असता आरोपीने गुन्हा नाकबूल असल्याचे सांगितले. त्यामुळे खटल्याची संपरीक्षा घेण्यात आली. अभियोग पक्षामार्फत सादर करण्यात आलेला पुरावा पाहता आरोपींचे विरुध्द त्यांनी गुन्हा केला आहे असे तथ्य प्रस्थापित न झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसार जबाब नोंदवण्यात आला नाही.

४. उपरोक्त परिस्थितीमध्ये आरोपी विरुध्द गुन्हा, त्यास अनुसरून सादर करण्यात आलेला पुरावा आणि त्याबाबत करण्यात आलेला युक्तिवाद पाहता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित राहतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १८/०९/२०२४ रोजी सकाळी ८.३० वा.चे सुमारास माडगुळे नसलेमळा येथे वर्दीदार यांचे घरासमोर, ता.आटपाडी, जि.सांगली येथे आरोपीने काठीने वर्दीदार यांच्या डावे हाताचे दंडावर, उजवे हातावर, डावे पायावर इच्छापूर्वक मारहाण करुन दुखापत पोहोचवली, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी... |
| २. | वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींने वर्दीदार यांचा जाणीवपूर्वक अपमान केला की, जेणेकरुन त्यांच्याकडून कोणतातरी अपराध घडावा असा त्यामागे उद्देश होता, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी... |
| ३. | काय आदेश ? | आरोपी यांना निर्दोषमुक्त ठरविण्यात येते... |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते २ बाबत –**

५. याकामी सरकारी वकील आणि आरोपी यांच्यामार्फत विधिज्ञ यांचा सखोल युक्तिवाद ऐकला.

६. अभियोग पक्षामार्फत मयुर भगवान नसले (सा.क्र.१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना काय घडली हे त्यांना सांगता येणार नाही. पोलीसांना वर्दी दिली होती का हे आठवत नाही. सदर साक्षीदाराने वर्दीवरील केवळ त्यांची सही मान्य केलेली आहे. परंतु वर्दीदार यांनी वर्दीमधील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शवलेली आहे. त्यामुळे, सरकारी वकील यांच्यामार्फत सदर साक्षीदाराला विनंतीपूर्वक सूचक प्रश्न विचारण्यात आले. मात्र, सदर साक्षीदाराने सदर प्रश्नांच्या उत्तरादाखल वर्दीमधील सर्व कथने नाकारली आहेत. त्यामुळे, अभियोग पक्षाला उपयुक्त होईल असे कोणतेही तथ्य प्रस्थापित झालेले नाही.

७. प्रकरणात साक्षीदाराचा पुरावा बारकाईने पाहिला असता वर्दीदार व आरोपी यांचे दरम्यान आपसात तडजोड झालेली आहे असे दिसून येते. वर्दीदार यांनी त्यांचे साक्षीपुराव्यादरम्यान त्यांचे व आरोपीमध्ये तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. त्या अनुषंगाने वर्दीदार व आरोपी यांनी संयुक्त तडजोड पुरसिस (१४) अभिलेखावर दाखल केलेली आहे. वर्दीदार व आरोपी यांच्यात आपसात तडजोड झालेली असल्याने वर्दीदार हे आरोपींविरुध्द साक्ष देणेस इच्छूक नाहीत असे दिसून येते.

८. आरोपी यांच्या मार्फत वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे, साक्षीदार याला दुखापती झाल्या हे सिध्द झाले तरीही सदर दुखापतीस आरोपी हे कारणीभूत आहेत असे उपलब्ध पुराव्यावरुन म्हणता येणार नाही. वर्दी देखील अभियोग पक्षातर्फे सिध्द करुन घेण्यात आली नाही. आरोपी व वर्दीदार यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्यामुळे उभय पक्षकारांना या प्रकरणात स्वारस्य नाही असे दिसून येते. आरोपीने वर्दीदार यांना मारहाण केली व त्यांचा जाणीवपूर्वक अपमान केला

असे दर्शवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. सबब, मुद्दा क्र.१ व २ प्रमाणे कोणतेही तथ्य प्रस्थापित होत नाही. त्यामुळे, मी त्यांचे उत्तर नकारार्थी देते.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत –</u>**

९. आरोपी यांनी गुन्हा केला आहे असे निर्विवादपणे प्रस्थापित होत नसल्यामुळे मी मुद्दा क्र.३ बाबत खालील आदेश पारीत करते –

**<u>आदेश</u>**

१. आरोपी **<u>मयुर भगवान नसले</u>** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ३५२ नुसार ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ ची पुर्तता ७ दिवसांच्या आत करायची आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात एम आर क्र. २२०/२०२४ अन्व्ये जप्त असलेला मुद्देमाल म्हणजेच एक रविचे लाकडी दांडके मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

(भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३९२(१) अन्वये घोषित करणेत आला.)

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.07.27 17:59:58 +0530

आटपाडी (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : २७/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

आटपाडी

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Arun Shivaji Yadav, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi. |
| Date | : | 27/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 27/07/2026 |
| Order uploaded on | : | 27/07/2026 |